**आयुक्त श्री.अण्णासाहेब मिसाळ यांनी जारी केले करोना विषाणू प्रतिबंधासाठी उपाययोजनांचे आदेश**

महाराष्ट्र शासनामार्फत कोरोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादूर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम, 1897 ची अंमलबजावणी 13 मार्चच्या अधिसूचनेनुसार सुरु करण्यात आलेली आहे. त्यामध्ये करोना विषाणूमुळे उद्भवणा-या संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महापालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी म्हणून महापालिका कार्यक्षेत्रासाठी घोषित करण्यात आलेले आहेत.

करोना विषाणू प्रतिबंधासाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांनी आज रविवारी सकाळी महापालिका मुख्यालयात तातडीने विभागप्रमुखांची बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली.

त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांनी सक्षम प्राधिकारी म्हणून महापालिका कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आदेश जारी केलेला आहे. या आदेशान्वये -

(1) करोना विषाणूचा प्रसार होऊ नये याकरिता खबरदारीची उपाययोजना म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, क्रीडा विषयक कार्यक्रमांना पुढील आदेशापर्यंत परवानगी नाकारण्यात आली आहे. तसेच यापूर्वी परवानगी देण्यात आली असल्यास सदर परवानगी रद्द करण्यात आली आहे.

(2) करोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अंगणवाडी, बालवाडी, सर्व सरकारी व खाजगी शाळा, महाविदयालये, कोचिंग क्लासेस, ग्रंथालये / अभ्यासिका, सिनेमागृहे, नाटयगृहे, सर्व गृहनिर्माण संस्था, हॉटेल व सार्वजनिक ठिकाणी असलेले जलतरण तलाव आणि व्यायामशाळा / जीम, मॉल्स, महापालिका बहुउद्देशीय इमारतीमधील सभागृहे तसेच खाजगी मंगल कार्यालये व सभागृहे, हॉटेल्समधील बॅंक्वेट हॉल्स, सर्व क्रीडा संकुले, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रे पुढील आदेश होईपर्यंत बंद राहतील.

(3) तथापि 10 वी व 12 वी च्या परीक्षा तसेच विश्व विदयालयाच्या परीक्षा शासन आदेशानुसार निश्चित वेळेत विहित वेळापत्रकानुसार घेण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे आजारी विदयार्थी हे इतर विदयार्थ्यांच्या संपर्कात येणार नाहीत याबाबत शिक्षण संस्था व व्यवस्थापनाने आवश्यक दक्षता व खबरदारी घ्यावयाची असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

(4) महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व उदयाने, पार्क, गार्डन ही क्षेत्रे प्रतिबंधीत करण्यात आली आहेत.

(5) मैदाने / मोकळया जागा या ठिकाणी नियोजित कोणत्याही प्रकारचे सामाजिक / सांस्कृतिक कार्यक्रम, उपक्रम व महोत्सव यांच्या आयोजनास प्रतिबंध करण्यात आला आहे.

याशिवाय महत्वाचे म्हणजे करोना बाधित प्रदेशातून प्रवास करुन आलेल्या प्रवाशाने 14 दिवसांच्या कालावधीकरिता आरोग्य विभागाच्या सुचनांनुसार स्वत:च्या घरात अलगीकरण (Home Quarantine) करुन राहणे बंधनकारक असणार आहे. केंद्र शासनामार्फत अलगीकरण संबधीच्या सूचनांचे काटकोरपणे पालन करणे गरजेचे असून तसे न केल्यास अशा प्रवाशांना राज्य शासनाने कार्यान्वीत केलेल्या अलगीकरण कक्षात दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावयाची असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील कोणतीही व्यक्ती, संस्था तसेच संघटना यांनी या नियमांचे पालन करणे अनिवार्य असणार आहे. या नियमांचे उल्लंघन केल्यास ते भारतीय दंडसंहिता (1860 चे 45) च्या कलम 188 नुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र राहतील व या नियमावलीनुसार प्राधिकृत अधिकारी उपरोक्त नुसार व वेळोवेळी शासनाने या नियमानुसार दिलेल्या सूचनांचे उल्लंघन करणा-याविरुध्द दंडनीय कारवाई करण्यास सक्षम असणार आहे. हे आदेश तात्काळ अंमलात येत असून पुढील आदेश होईपर्यंत अस्तित्वात राहतील असे नमूद करण्यात आले आहे.

करोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य हिताच्या दृष्टीने या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत असून नागरिकांनी त्यासाठी संपूर्ण सहकार्य करावे असे आवाहन करतानाच महापालिका आयुक्त श्री. अण्णासाहेब मिसाळ यांनी नागरिकांनी घाबरून न जाता सावध राहून नियमितपणे साबण व पाणी वापरून आपले हात स्वच्छ धुवावेत, डोळे नाक व तोंडाला स्पर्श करणे टाळावे, खोकताना व शिंकताना स्वच्छ हातरूमालाचा वापर करावा, करोनाग्रस्त रूग्णाच्या संपर्कात असेल तरच एन 95 या विशिष्ट मास्कचा वापर करावा असेही आवाहन केले आहे.

Commissioner Shri Annasaheb Misal orders below measures to curb Karona virus:

Implementation of the Prevention of Disease Prevention Act, 1897 in the State of Maharashtra has been initiated in accordance with the notification dated March 13 to prevent the spread of corona virus (Covid 19) by the Government of Maharashtra. Among them, the Commissioner of Municipalities has been declared as a competent authority for the prevention and control of infectious diseases caused by the Corona virus.

In order to take immediate measures to prevent Corona virus, Commissioner Shri. Annasaheb Misal held a meeting of the heads of departments at the municipal headquarters on Sunday morning.

Navi Mumbai Municipal Commissioner Shri. Annaheb Misal has issued an order as a competent authority to take preventive measures to control and prevent the spread of Covid 19 in the jurisdiction of the municipality. By this order –

(1) Social, cultural, political, religious, educational, and sports related programs in the municipal area have been refused permission to prevent further crowds in one place as a precautionary measure to prevent the spread of corona virus. Also, if this permission has been given earlier, this permission has been revoked.

(2) To prevent the spread of the Corona virus all Anganwadi, kindergarten, all government and private schools, colleges, coaching classes, libraries / study, theaters, theaters, Swimming Pools and gyms in housing societies, hotels and public places, public swimming pools & gyms, Community halls in municipal multipurpose buildings as well as private wedding halls, hotels. Banquet halls, sports complexes all, senior citizen relaxation centers will remain closed until further orders.

(3) However, the examination of the 10th and 12th as well as the examination of the universities will be conducted at the prescribed time-limit in accordance with the Government order. Similarly, it has been stated that the education institute and management should take necessary precautions and precautions to ensure that the sick students will not come in contact with other students.

(4) All park, garden in the area of municipal are restricted.

(5) No social / cultural events, activities and festivals planned on the grounds / open spaces are prohibited.

In addition, a traveler traveling through the Corona-affected region will be obliged to stay in his home in accordance with the health department's instructions for a period of 14 days. It has been stated clearly that the Central Government should strictly comply with the separation instructions and if it does not do so, such travelers will be lodged in the separation room executed by the State Government.

It will be compulsory for any person, institution or organization in the jurisdiction of Navi Mumbai Municipal Corporation to comply with these rules. If they violate these rules, they will be subject to penalties / legal proceedings under section 188 of the Indian Penal Code (45 of 1860).

Under this Rule, the Authorized Officer shall be able to take punitive action against the violation of the instructions given by the Government in accordance with this rule from time to time. These orders go into effect immediately and are stated to exist until the next order.

All these preventive measures are being taken in the interest of public health to prevent the spread of Corona virus and citizens should cooperate fully. Municipal Commissioner Shri. Annasaheb Misal also urged citizens to regularly wash their hands with soap and water without being scared, to avoid touching the nose and mouth, to use clean handloom while coughing and sneezing, and to use N95 special mask only when in contact with coronary patients.

महाराष्ट्र शासन

अत्यंत तातडीचे

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १६ मार्च २०२०

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व)
पोलीस अधिक्षक (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद (सर्व)

विषय: **राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत (ग्रामीण क्षेत्रातील आस्थापन बंद करणेबाबत)..**

संदर्भ: शासन समक्रमांकाचे दि.१४ मार्च,२०२० व १५ मार्च २०२० रोजीची पत्रे.

राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना व नियमावली निर्गमित केलेली आहे.

दिनांक १५ मार्च २०२० च्या पत्रानुसार करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत या क्षेत्रातील खालील आस्थापना साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

१. चित्रपटगृहे
२. तरणतलाव
३. व्यायामशाळा
४. नाट्यगृहे
५. म्युझीयम

सक्षम अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार ग्रामीण क्षेत्रातीलसुध्दा वरील आस्थापना साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचित करण्यात येत आहे म्हणजे उपरोल्लेखीत सर्व आस्थापना पूर्ण महाराष्ट्र राज्यात दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

तरी उपरोक्तनुसार तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग

प्रत प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत संचालक, पुरातत्व विभाग, मुंबई
प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव

**Government of Maharashtra**

**Very Urgent!**

NO. Corona 2020/Case No 58/Helth 5
Departement of Public Health
Gokuldas Tejpal Hospital Compound
Complex Building, New Ministry
Mumbai 400 001
Date – 16.03.2020

To,
District Collector (All)
Superintendent of Police (All)
Chief Executive Officer
Zilla Parishad

Subject: Regarding preventive measures to prevent the spread of corona virus (Covid 19)in the state (Regarding closure of establishment in rural areas)
Reference: Government letters dated 14th March 2020 & 15th March 2020

To prevent spread of Corona Virus in state, the government of Maharashtra has applied the prevention of disease Act, 1897 & Government has issued notifications and manuals as per provision available in section 2,3 &4 of this act.
As per provision under the prevention of disease Act,1897, & as per approval of competent authority, it is informed through letter dated 15th march 2020 to prevent spread of Corona Virus in state, following establishment which comes under all Municipal Corporation, Municipality, Nagarpanchayat will be closed till 31st march 2020.

1) Cinema Hall
2) Swimming Pool
3) Gymnasium
4) Theaters (Auditorium)
5) Museum

According to the instructions received from the competent authorities, the above establishment in the rural areas also advised to keep close till 31st March 2020 as per provision under the the Prevention of Disease Act, 189. That is, it is suggested that all the above mentioned establishments be closed in the whole state of Maharashtra till 31st March 2020.

However, immediate action should be taken according to the above and a compliance report should be submitted to the Government.

**Signature done by**
**Mr. Pradip Vyas,**
**Principal Secretary Government of Maharashtra**

Copy to

Copy to Upper Chief Secretary, Village Development Department

Copy to Principal Sectetory, Dept of Culture affairs and tourism

Copy to Divisional commissioner (All)

Copy to Directorate, Department of Archeology, Mumbai.

Copy to Commissioner, Health Care – Mumbai

Copy to Directorate Health Care , Mumbai & Pune

Copy to Directorate Medical Education and research, Mumbai

Copy to Principal Secretary of Chief Minister,

Copy to Secretary of Dy. Chief Minister

Copy to Deputy Secretary of Chief Secretary

# BRIHANMUMBAI MAHANAGARPALIKA

No: MGC/A/2873 dt 16/3/2020

ORDER UNDER RULE-10 FOR SOCIAL DISTANCING

WHEREAS the Government of Maharashtra, in exercise of the power conferred under section 2,3 &4 of the Epidemic Diseases Act, 1897 has framed Regulations for prevention and containment of COVID-19 under No. Corona 2020/ CR/ 58/ Aarogya-5 dated 13th March 2020.

AND WHEREAS under rule 10 of the said Regulation, the Municipal Commissioner is authorized to take any measures as directed by the Public Health Department, Govt. of Maharashtra for containment of COVID-19,

I, Praveen Pardeshi, Municipal Commis sioner of Municipal Corporation of Greater Mumbai, in exercise of said powers conferred upon me hereby direct under rule 10 of the said Regulation to implement the following containment measures in the City of Mumbai.

1. Restricting the vehicular movement in the areas of Isolation Centres, Quarantine Centres, declared by MCGM like Kasturba Hospital, KEM Hospital, Seven Hills Hospital.
2. Closure of schools, offices, cinema halls, swimming pools, gyms etc. and banning mass congregations, functions.
3. All non essential service providing offices to function at only 50% staff capacity. However, following establishments providing essential services shall be excluded -
   - Providing drinking water,
   - Providing sewerage services,
   - Providing banking services,
   - Providing telephone and internet services,
   - Providing rail and transportation services,
   - Providing food, vegetable, groceries,
   - Hospitals, Medical centres and Medical stores,
4. Asstt. Commissioners and Police to issue advisory to people, not to gather in masses at sea beaches and public places.
5. Private sector Companies and Public Sector companies to encourage all their staff to work from home.

Asst. Commissioners of the wards and Zonal Dy. Municipal Commissioners of MCGM are hereby authorised to take all necessary actions for implementation of the above measures. Failure to obey these orders shall be penalized under section 188 of I.P.C.

Municipal Commissioner

All Add MC's

All DMC's

All AC's Police Commissioner/ All DCP.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

**वाचा** :- १) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग कडील अधिसूचना क्र.करोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5, दिनांक 13 मार्च 2020.

२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग कडील अधिसूचना क्र.करोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य 5, दिनांक 14 मार्च 2020 अन्वये " महाराष्ट्र कोव्हिड 19 उपाययोजना, नियम 2020.

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,**
क्र.आव्यप्रकक्ष/कावि/ 122 /2020.
पुणे, दिनांक :- 15 /03/2020.

**परिपत्रक**

ज्याअर्थी, राज्य शासनाने संदर्भीय १ अन्वये करोना विषाणूचा ( कोव्हीड १९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३, व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणी साठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भीय २ अन्वये प्रसिद्ध केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

त्याअर्थी, करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून पुणे जिल्ह्याचे कार्यक्षेत्रातील सर्व उद्योग आस्थापनांना सूचित करणेत येत आहे कि, ज्या उद्योग आस्थापनांमध्ये जसे **IT./Software/ Information Technology Enabled Services,** सेवा आणि इतर उद्योग क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांना निवासस्थानातून त्यांचे कार्यालयीन कामे करता येणे शक्य आहे आणि त्यामुळे संबंधित उद्योग आस्थापनेच्या उत्पादन, सेवा आणि दैनंदिन कामकाजावर काहीएक परिणाम होणार नसेल तर अश्या उद्योग आस्थापनांना याद्वारे जाहिर आवाहन करणेत येत आहे कि, त्यांनी त्यांचे अधिकारी/कर्मचारी यांना **दिनांक 31/3/2020** पर्यंत त्यांचे निवासस्थानातून कार्यालयीन कामे करण्याबाबत परवानगी देणेसाठी आपलेस्तरावरून योग्य तो निर्णय तात्काळ घ्यावा.

जिल्हाधिकारी पुणे

( नवल किशोर राम )
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रति,

१. सर्व विभागप्रमुख, -----------------, जिल्हा पुणे यांना पुढील कार्यवाहीसाठी.
२. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, ---------------, जिल्हा पुणे यांना पुढिल कार्यवाहीसाठी.
३. सर्व तालुका दंडाधिकारी, ---------------, जिल्हा पुणे यांना पुढिल कार्यवाहीसाठी.

प्रत :- १. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner